ललिता गंडभीर
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# टोळीयुगातून अस्तित्ववादाकडे

'व्हॅल्यू सिस्टीम ॲनॅलिसिस थिअरी' अनुसार समाज व व्यक्ती यांच्या मानसिक उत्क्रांतीच्या आठ पातळ्या आहेत. जन्मल्यानंतर सर्व मुले पहिल्या दोन पातळ्यांतून जातात. त्यानंतर त्यांची मानसिक उत्क्रांती किती होईल, यावर स्त्री पुरुषांचं व्यक्तिमत्व, मूल्ये, विचारसरणी, वागणूक, न्याय-अन्यायाच्या कल्पना व त्यांनी आपलं आयुष्य कसं व्यतीत करायचं, ह्याविषयी निर्णय अवलंबून असतात. समाज अनेक व्यक्तींचा बनलेला असतो. परिणामी समाजाची धारणा, प्रगती, उन्नती किंवा अधोगती व मानसिकता ही त्या समाजातील व्यक्तीच्या मूल्यांची गोळाबेरीज असते. आठ पातळ्यांचं संक्षिप्त वर्णन पुढीलप्रमाणे:

१)बाल्यावस्था (Infantile) : नुकतं जन्मलेलं मूल अथवा बुद्धीने कमकुवत व्यक्ती ह्या पातळीवर असतात. त्यांना फक्त भूक, तहान अशा मूलभूत गरजा समजण्याएवढी बुद्धी असते. त्यांचं मन अविकसित असतं.

२)टोळी वर्ग (Tribalistic) : टोळी वर्गाच्या समाजामधली माणसं एका पुढाऱ्याची अथवा धर्मगुरूची, थोडक्यात एका व्यक्तीची आज्ञा पाळतात. ती आज्ञा योग्य आहे की अयोग्य याचा फारसा विचार ती करीत नाहीत. जगात सुरवातीला आदिमानव एकत्र राहू लागले. तेव्हा असा समाज अस्तित्वात आला. असल्या पुढाऱ्याशी टोळीयुगातील मानसिकतेच्या व्यक्ती व समाज इमान राखून असतो. प्रसंगी त्याच्यासाठी ते जीवही देतात. मनाने टोळीयुगातील व्यक्ती व समाज भूतकाळात राहतात. भविष्याचा विचार ते करीत नाहीत. परिणामी अशा समाजात राहणाऱ्या द्रष्ट्या किंवा शास्त्रीय विचारसरणीच्या माणसाने समाजमान्य नसलेले विचार मांडले किंवा नवे शोध लावले, तर टोळीयुगातील समाज ते समजून घेऊ शकत नाही. उलट तो प्रगतीशील व्यक्तींना कसून विरोध करतो. त्यांचा छळही करतो. मुले मोठी होताना टोळीसमाजाच्या वृत्तीची असतात. पौगंडावस्थेत त्यांचे विशिष्ट प्रकारचे कपडे असतात. त्यांचे हीरो असतात. आपल्याच वृत्तीच्या, वयाच्या मुलांबरोबर ती मुले वेळ घालवतात. विशी-बाविशीनंतर काही मुले मनाने टोळीसमाजातच राहतात. तर काहींची मानसिक उत्क्रांती चालू राहते. टोळीयुगातल्या समाजाची ठरलेली कार्ये अथवा रिच्युअल्स असतात. मध्ययुगात कसोशीने धर्म

पाळणाऱ्या समाजाची अशी धार्मिक रिच्युअल्स होती, अजूनही आहेत. वर्तमान जगात माफिया अथवा गॅंग्ज हे टोळीसमाजाच्या प्रवृत्तीच्या संघटनेचे उदाहरण आहे. पुष्कळदा मनाने टोळीसमाजात असलेले, विशीच्या आतले तरुण गॅंग्जमध्ये भाग घेतात. त्यांची मानसिक उत्क्रांती झाली की, गॅंग्जमधून बाहेर पडायला धडपडतात.

३)स्वयंकेंद्री (Egocentric) : 'माझंच खरं', 'मी म्हणेन तसचं व्हायला पाहिजे', 'मी करीन तो कायदा', असं म्हणणारे स्त्री-पुरुष ह्या वृत्तीचे असतात. नीती, कायदे, धर्म असली बंधन त्यांना अमान्य असतात. पैसा, जमिनी, धंदा व राजकीय सत्तेचं त्यांना फार आकर्षण असतं. स्वयंकेंद्री व्यक्तींना समझोता करण्याची भाषा समजत नाही. म्हणून त्यांच्या सत्तालोलुपतेला आळा घालण्यासाठी त्यांच्यापेक्षा शक्तिवान, बलाढ्य स्त्रीपुरुषांची जरुरी असते. पैसा, शस्त्रास्त्रे, ज्ञान, समाजातले सत्ताधारी पुढारी अशा स्वयंकेंद्री शक्तींना घाबरतात.

४) नियमपालक (Conformist) : समाजामध्ये कन्फर्मिस्ट स्त्रीपुरुष नाती, धर्म, कायदे, परंपरा, तत्वज्ञान यांच्यापैकी एका नियमाचं पालन करतात. आपण नियम पाळतो याचा त्यांना अभिमान वाटतो. नियम सुस्पष्ट नसले, तर हे कन्फर्मिस्ट गोंधळतात. नियम समजावून घेण्यासाठी त्यांना ह्या नियमांत प्रवीण असलेल्या व्यक्तिची मदत लागते.

५) कारस्थानी (Manipulative) : सरड्या प्रमाणे परिस्थितीनुसार कारस्थानी माणसं व्यक्तिमत्व व वागणूक बदलतात. आपला हेतू साधण्यासाठी ते कायदे वाकवतात. पण शक्यतो कायदे मोडत नाहीत. त्यांना यश हवं असतं. यश साध्य करण्यासाठी आवश्यक वाटेल तसं ते बोलतात, करतात. त्यांना स्वतःची अशी मूल्ये नसतात. धार्मिक माणसाबरोबर ते धार्मिकतेचा आव आणतील. लष्करात लष्कराचे नियम पळतील. ही माणसं नोकरीत टिकत नाहीत. बहुतेक धंदेवाईक, विक्रेते, राजकारणी या प्रवृत्तीचे असतात. मधूनच वर्तमानपत्रात झळकणारे स्टॉक मार्केटचे किंवा इतर स्कॅम खेळणारे लोक या पातळीचे असतात.

६) समाजकेंद्री (Sociocentric) : समाजकेंद्री स्त्रीपुरुष समाजचं भलं करण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेले असतात. आपलं ध्येय साध्य करायला खूप मोठा स्वार्थत्याग करायलाही ते तयार असतात. सत्ताधीशांचा धाकधपटशा, नातेवाईकांच्या प्रेमाची ओढ त्यांना ध्येयनिष्ठेपासून विचलित करू शकत नाही. बहुतेक समाजकेंद्री लोक निसर्ग व जनावरप्रेमी असतात. पैशाचा किंवा सत्तेचा मोह त्यांना नसतो. जगात महत्वाचे फरक व्हायला ह्या व्यक्ती कारणीभूत होतात. जगातले संशोधक, क्रांतिकारक, काही लेखक या वर्गातले असतात. उदा. लोकहितवादी, आगरकर, महात्मा फुले, सुभाषचंद्र बोस. राजा या प्रवृत्तीचा असेल, तर देशाची प्रगती होते.

७) अस्तित्ववादी (Existentialist) : ह्या व्यक्तींना त्यांचं जे ध्येय असेल त्याकडे पोहोचायच्या क्रियेत रस असतो. प्रसिद्धी, पैसा सत्ता अशा धर्तीच्या त्यांच्या ध्येयसिद्धीमुळे होणाऱ्या स्वतःच्या फायद्याची त्यांना हाव नसते. ते क्रियाशील व मुक्त मनाचे असतात. त्यांचं कार्य करताना आलेल्या अनुभवात व त्यामुळे झालेल्या मानसिक वाढीत व ज्ञानात त्यांना समाधान लाभतं. प्रत्येक प्रश्नाचे अनेक पैलू लक्षात घेऊन, जरूर पडल्यास तडजोड करून माणसं तो प्रश्न सोडवितात. ह्या व्यक्तींना नातेवाईक, मित्रमैत्रिणींची जरुरी कमी प्रमाणात असते. लेखक, कवी, शास्त्रज्ञ, काही यशस्वी दूरदृष्टी असलेले पुढारी. नवे धंदे व कारखाने सुरु करणारे मालक अस्तित्ववादी असतात. समाजकेंद्री व अस्तित्ववादी यांच्या व्यक्तिमत्वात फरक असतो. समाजकेंद्री तडजोड करण्यास तयार नसतात, तर अस्तित्ववादी परिस्थितीचा अभ्यास करून ध्येयाला मुरड घालून मधला मार्ग शोधतात. कॉंप्रमाइझ करतात.

८) ह्या पातळीच्या स्त्रीपुरुषांना योग्यासारख्या (सर्वसाधारण माणसांना नसलेल्या) शक्ती असतात. (Supernatural Powers) ते भविष्यकाळ ओळखतात. स्वतःचं हृदय थांबवतात. एकमेकांना अंतरावरून संदेश पाठवतात. अशा माणसांची संख्या जगात फारच थोडी आहे.

पुढील मुद्दे विचारात घेणं महत्वाचं आहे :

१)ह्या पातळ्या किंवा लेव्हल्स यांचा समाजाच्या थोरवीशी, उच्चतेशी संबंध नाही. व्यक्तीची पातळी वरच्या आकड्याची म्हणून ती व्यक्ती श्रेष्ठ आहे. असंही नाही.

२)मुलांची, स्त्रीपुरुषांची जन्मल्यापासून मानसिक उत्क्रांती होत जाते. ट्रायबलिस्टीक पातळीपर्यंत सर्व स्त्रीपुरुष पोचतात. तिथून पुढे सातव्या पातळीपर्यंत काहींची मानसिक उत्क्रांती होत जाते. तर काही मधल्या एका पातळीवरच राहतात. विशीत कन्फर्मिस्ट असणारा माणूस तिशीत मॅन्युप्युलेटिव्ह व चाळीशीत समाजहितवादी होऊ शकतो. अमेरिकन यशस्वी इंडस्ट्रीयालिस्टसनी उतारवयात समाज सुधारणेसाठी फौंडेशन स्थापन केलं. ते अशा मानसिक उत्क्रांतीतून गेले असावेत.

३)सर्व स्त्रीपुरुषांच्या मानसिकतेत घराबाहेर स्वयंकेंद्री असणारा व्यापारी अथवा राजकीय पुढारी घरात पाऊल टाकताच बायको म्हणेल तसं वागणारा असू शकतो. घरात तो ट्रायबलिस्ट होतो. घराबाहेर धंदा यशस्वी करण्यासाठी कायदे मोडणारा, अन्यायाने वागणारा धंदेवाईक मनापासून, अगदी गुरुजी सांगतील त्या रीतीने, भक्तिभावाने देवाची पूजा करणारा असू शकतो. त्याच्या मानसिकतेचा एक भाग किंवा कप्पा कन्फर्मिस्ट असतो. म्हणून एरवी तो मॅन्युप्युलेटिव्ह असला, तरी धर्माच्या बाबतीत नियमपालक असतो.

४)खालच्या पातळीच्या स्त्रीपुरुषांना वरच्या पातळीची मानसिकता समजून घेणं कठीण जातं. खालच्या पातळीच्या मानसिकतेच्या व्यक्तीच्या हाती सत्ता असेल व वरच्या पातळीच्या व्यक्तीवर तो सत्ता गाजवीत असेल, तर कलह अटळ असतो. आई-वडील व मुलात असे कलह परत परत होताना दिसतात. आईवडील टोळीसमाजातील किंवा कन्फर्मिस्ट मानसिकतेचे असले व

मुलगा मॅन्युप्युलेटिव्ह अथवा समाजहितवादी पातळी या मानसिकतेचा असला की, मुलाने भविष्यात काय करावं याबद्दल त्यांचे विचार वेगळे असतात.

मुलाला करायची असते समाजसेवा किंवा धंदा. आईवडिलांना वाटतं, त्याने आतापर्यंत सर्व उदरभरणासाठी केली त्याप्रमाणे नोकरी करावी. किंवा मुलीला करायचा असतो आंतरजातीय विवाह. आईवडिलांना ते मुळीच पसंत नसतं. आईवडील कन्फर्मिस्ट असले व मुलगा स्वयंकेंद्री असला, तर घरात भांडण होतात. वडील व मुलगा दोघंही स्वयंकेंद्री असले तर रणकंदन माजतं. या उलट आईवडील मनाने अस्तित्ववादी पातळीचे असते, तर मुलाची अथवा मुलीची विचारसरणी समजून घेऊन त्यांना ते मार्गदर्शन करू शकतात. जे घरात घडतं तेच धंद्यात, ऑफिसात घडतं. मोठ्या कंपन्यांचा सी.ई.ओ. अथवा बॉस अस्तित्ववादी असेल, तर तो कामगारांना समजून घेऊन कंपनी यशस्वीपणे चालवितो. त्याच्या जागी स्वयंकेंद्री आला तर असंख्य कलह होतात. कन्फर्मिस्ट आला की, कंपनी आतापर्यंत चाललेल्या मार्गाने चालू रहाते. प्रगती किंवा बदल होत नाहीत. हाताखालच्या स्वयंकेंद्री  व अस्तित्ववाद्यांशी कन्फर्मिस्टच भांडण होते. नव्या कल्पना कन्फर्मिस्ट बॉसला पसंत पडत नाहीत. मॅन्युप्युलेटिव्ह माणूस बॉस झाला, तर तो ट्रायबलिस्टिक, कन्फर्मिस्ट व स्वयंकेंद्री नोकरवर्गाला सांभाळून घेऊ शकतो. पण त्याच्या हाताखालच्या अस्तित्ववाद्याशी त्याचा कलह होतो. परिणाम अस्तित्ववादी नोकरी सोडण्यात होतो. ट्रायबलिस्टिक, स्त्रीपुरुष बॉस होणं टाळतात. नोकरी करणारे समाजहितवादी ती सामाजहिताशी संबंधित असेल, तरच नोकरीत टिकतात. नाहीतर ते नोकरीच सोडून देतात.

५)शिक्षणाने समाजाची पातळी वरच्या थराला जाण्यास मदत होते. इंग्लिश भाषा शिकल्याने व त्या भाषेतील वाङमय वाचल्याने भारताच्या स्वातंत्र्याच्या कल्पनांना खतपाणी मिळाले. परंतु समाज शिक्षित किंवा शास्त्रीयदृष्ट्या प्रगत झाला म्हणून त्याची पातळी वाढेल, याची खात्री नाही. उदा.हिटलरची आज्ञा आंधळेपणाने पालन करणारी जर्मन प्रजा शिक्षित व शास्त्रीय दृष्ट्या प्रगत होती.

६)समाजहितवादी, अस्तित्ववादी अगदी सर्वच काळात अस्तित्वात होते. मराठी व इतर संत समाजहितवादी होते. बादशहा अकबर, सवाई माधवराव अस्तित्ववादी होते.

७)जगात सर्वच देशात बहुतेक समाज ट्रायबलिस्टिक, कन्फर्मिस्ट असतो. थोडक्यात बहुतेक लोक असेल, त्या परिस्थितीशी जमवून घेतात. देशातील धंदेवाईक राजकारणी, पुढारी, चित्रपट, दूरचित्रवाणी, नाटक, वर्तमानपत्र यांचे लेखक व इतर कलाकार, द्रष्टे शास्त्रज्ञ व गुन्हेगार हे सर्व स्वयंकेंद्री मॅन्युप्युलेटिव्ह सोशिओसेंट्रिक नागरिकांतून निर्माण होतात. ह्या पातळ्यांच्या नागरिकांचं प्रमाण पाश्चात्य समाजात प्रत्येक लेव्हलला पाच टक्यांच्या आसपास असतं. समाजाची प्रगती किंवा अधोगती ह्या नागरिकांवर व त्यांना समाजात मिळणाऱ्या मदतीवर अवलंबून असते. समाजातले धंदेवाईक,राजकारणी,पुढारी व गुन्हेगार यांच्यात मॅन्युप्युलेटिव्ह व स्वयंकेंद्री वृत्तीचं मिश्रण असतं. राजकारण खेळणाऱ्यांच्या स्वभावात त्यांना यश प्राप्त होण्यासाठी

कारस्थानीपणाचा अंश असावा लागतो. जगातले क्रांतिकारक समाजहितवादी व अस्तित्ववादी असतात. त्यांच्या ध्येयनिष्ठेमुळे ते परकीय वा स्वकीय सत्तेशी लढा देऊन क्रांती घडवून आणतात. पण स्वातंत्र्य पदरात पडलं की, राष्ट्र चालवण्यासाठी मॅन्युप्युलेटिव्ह अथवा कारस्थानी प्रवृत्तीच्या पुढाऱ्यांची जरुरी असते. ती छटा या ध्येय व तत्वनिष्ठ क्रांतिकारकांच्या स्वभावात नसते. परिणामी क्रांतिकारक राजकारणात यशस्वी होऊ शकत नाहीत. ह्याचं हल्लीचं उदाहरण म्हणजे व्ह्लाव्ह हावेल. हे चेक रिपब्लिक पुढारी. क्रांतिकारक म्हणून त्यांना यश लाभलं. पण पुढारीपण जमलं नाही.

देशाचं भलं होण्यासाठी पुढारी अस्तित्ववादी असल्यास त्याला कारस्थानी खेळ खेळण्याची कला अवगत असावी लागते. माझ्या मते अमेरिकेचे माजी अध्यक्ष प्रेसिडेंट बिल क्लिंटन हे अशा प्रकारचे पुढारी होते-आहेत.

अस्तित्ववादी पुढाऱ्यांच्या हातात सत्ता गेली तर देशाचं कल्याण होतं. अमेरिकेने ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळविल्यावर अमेरिकेची घटना लिहिणारे पुढारी असे द्रष्टे अस्तित्ववादी होते, हे अमेरिकेचे भाग्य. त्यांच्यामुळे सर्व जगात राजेशाही सरंजामशाही असताना अमेरिकेत लोकशाही स्थापन झाली. धंदेवाईक कारखानदार प्रामुख्याने मॅन्युप्युलेटिव्ह असतात. व्यापाऱ्यांच्या जगात यशासाठी कारस्थानीपणाची जरुरी असते. देशाच्या भरभराटीसाठी धंदेवाईक महत्वाचे असतात. त्यांच्यामुळे नोकऱ्या निर्माण होतात. सरकारला करप्राप्ती होते. गुन्हेगारांत स्वयंकेंद्री वृत्तीचा मोठा अंश असतो. त्यांचे अनुयायी ट्रायबलिस्टिक तरुण असतात. ह्या तरुणांच्या मदतीने गुन्हेगार यशस्वी होतात. समाजात राजकीय वा सामाजिक सुधारणा घडवण्याचं काम प्रामुख्याने समाजहितवादी व अस्तित्ववादी करतात. ह्या समूहातील लेखक, नाटककार आपल्या कलाकृतीच्या सहाय्याने समाजात फेरबदल घडवून आणण्याचा प्रयत्न करू शकतात. उदा.शारदा हे नाटक, कुंकू हा सिनेमा.

छोट्यामोठ्या प्रमाणात समाजहिताची कामे करणारे समाजहितवादी कार्यकर्ते आपल्याला जगभर विखुरलेले दिसतात. महत्वाचा शोध लावणारे अस्तित्ववादी समाजाच्या राहणीत, विचारसरणीत मुलभूत क्रांती घडवून आणतात. याचं उदाहरण प्रिंटींग प्रेसचा शोध अथवा संगणक. प्रिंटींग प्रेसमुळे पुस्तके पर्यायाने ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोचले. संगणक युगाची क्रांती तर अजून चालूच आहे.

व्यापक समाजसुधारणा होण्यासाठी समाजहितवादी अस्तित्ववादींना बहुसंख्यांकांचा पाठींबा लागतो. चळवळ दोन, तीन पिढ्या चालू राहावी लागते. उदा. भारतातील स्त्री शिक्षण किंवा पाश्चात्य स्त्रियांनी मतप्राप्तीसाठी केलेली चळवळ. कुठल्याही मानवी वर्गीकरणाप्रमाणे हे वर्गीकरण ढोबळ आहे. तरीसुद्धा त्याचं ज्ञान इंडस्ट्री, धंदेवाईक पुढारी व समाजसुधारक यांना उपयुक्त आहे. कामगारांना कल ओळखून, त्यांना योग्य काम देण्यासाठी इंडस्ट्रीची मॅनेजमेंट ह्या माहितीचा उपयोग करून घेऊ शकते. समाजातील अन्यायाशी झगडणाऱ्या, समाजसुधारणा

करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अस्तित्ववादी व समाजहितवादी स्त्रीपुरुषांना व त्यांच्या संघटनांना समजून घेण्यासाठीही व्यक्तींच्या विविध पातळ्यांच ज्ञान असणं महत्वाचं आहे.

पूर्वप्रसिद्धी : महाराष्ट्र टाईम्स, जून /२३/२०००.